www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज




मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : 25   मंगळवार दि. 30 सप्टेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514




# शेतकऱ्यांचं मरण : महिनाभरात 26 लाख हेक्टरला फटका; खरिप हंगामातील 52 लाख हेक्टरवरील पिके गेली पाण्यात

पुणे : राज्यात अनेक ठिकाणी गेल्या महिनाभरात अतिवृष्टीने हाहाकार माजवला असून, शेतकऱ्यांच्या स्वप्नांची अक्षरशः माती झाली. बीड, जालना, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव, यवतमाळ या जिल्ह्यांना एकट्या सप्टेंबर महिन्यात मोठा तडाखा बसला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे क्षेत्र वाढत आहे. सप्टेंबर महिन्यात तब्बल २६ लाख हेक्टरचे नुकसान झाल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले. त्यात बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत प्रत्येकी पावणेसहा लाख हेक्टरपर्यंत नुकसान झाले आहे. त्या खालोखाल जालना आणि सोलापूर जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. हे अंदाजित नुकसान २७ सप्टेंबरपर्यंत झालेल्या अतिवृष्टीमुळे झाले असल्याचे कृषी विभागाने



सांगितले. परिणामी, आता संपूर्ण खरिपात नुकसान झालेले क्षेत्र तब्बल ५२ लाख हेक्टरवर पोहोचले आहे.

अतिवृष्टी, महापूर आणि नुकसान या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाची पहिलीच बैठक मंगळवारी होत असून खरडून गेलेली शेती, दयनीय अवस्था झालेले शेतकरी, सर्वस्व गमावलेले लोक यांना कोणता दिलासा देणार याकडे डोळे लागले आहेत. निकष बाजूला ठेवून वाढीव मदत देण्याची भूमिका जाहीर केली जाईल, असे सूत्रांनी सांगितले. यंदाचे शेतीचे नुकसान (हेक्टरमध्ये) जून १.३४ लाख जुलै १.४४ लाख ऑगस्ट २४.४४ लाख सप्टेंबर २६ लाख पुरामुळे राज्यात ४१ हजार नागरिकांचे स्थलांतर अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे राज्यात तब्बल ४१,०६७ नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. १४७ निवारा केंद्रे स्थलांतरितांसाठी राज्यभरात उभारण्यात आली आहेत. ७५निवारा केंद्रे एकट्या सोलापूर जिल्ह्यात आहेत.

## पूरग्रस्तांना पायावर उभे करणार : मुख्यमंत्री

यवतमाळ : राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे मिशन सुरू आहे. पुढील दोन-तीन वर्षांत हे उद्दिष्ट पूर्ण झाल्यावर ५० लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणू, असे सांगत पुरामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीद्वारे पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करू, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती समारोहात ते बोलत होते. राज्यपाल आचार्य देवव्रत नैसर्गिक शेतीचे तज्ज्ञ आहेत. त्यांचे मॉडेल राज्यात पुढे नेऊन अडचणीतील शेती व शेतकऱ्याला बाहेर काढू, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## विद्यमान आमदार बबनरावजी लोणीकर यांची सावरगाव (बु) पूरग्रस्त गावाला भेट



दैनिक युवक आधार
कार्यकारी संपादक : प्राचार्य जगन्नाथ रासवे
आज दिनांक २९ सप्टेंबर 2२०२५सावरगाव बु. येथे अतिवृष्टी व गोदावरी नदीचे बॅक वॉटर पाणी गावात शिरले असल्याने माजी मंत्री तथा आमदार श्री.बबनराव लोणीकर आले असता गावात येऊन सर्व लोकांना स्थलांतर करण्याबाबत तसेच आष्टी व लोणी येथे राहण्याची व जेवण्याची व्यवस्था असल्याने गावकऱ्यांना विनंती केली.

तसेच सर्व गावकऱ्यांनी काळजी घ्यावी मी सुखदुःखात गावकऱ्यांसोबत आहे असे लोणीकर साहेब यांनी गावात येऊन सर्व लोकांना संबोधित करून धीर देण्याचे काम केले.

तसेच काही परिस्थिती उद्‌भवल्यास सर्व लोणीकर टीम सोबत असल्याचे लोणीकर साहेबांनी सांगितले.

यावेळी सोबत उपविभागीय अधिकारी परतुर, कृषी अधीक्षक जालना, गटविकास अधिकारी परतुर, आरोग्य अधिकारी,तुकाराम सोळंके, गजानन लोणीकर, रमेश थोरात,विठ्ठल तौर, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक व गावातील सर्व नागरिक उपस्थित होते.

## महामार्ग दुरुस्तीसाठी काँग्रेस आक्रमक जागतिक बँकेच्या कार्यालयास टाळे ठोकुण धरणे आंदोलन

दैनिक युवक आधार
नेवासा प्रतिनिधीः- लखन वाल्हेकर
अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गाची खड्डे पडून झालेली दुरावस्था व या महामार्गाच्या देखभालीची जबाबदारी असणारे जागतिक बँकेचे प्रशासनाचे दुर्लक्ष याविरोधात आज काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत जागतिक बँकेच्या कार्यालयास टाळे ठोकुण त्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. परंतु आंदोलनाची तात्काळ दखल घेत कार्यकारी अभियंता यांनी दोनच दिवसामध्ये डांबराने खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले जाईल असे स्पष्ट करत अहिल्यानगर ते घोडेगाव या कामाची तातडीने वर्क ऑर्डर काढण्यात आली असून. घोडेगाव ते वडाळा या दरम्यानच्या दुरुस्तीची वर्कऑर्डर दोन दिवसात काढून डांबर व खडीने खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले जाईल असे स्पष्ट केले.

यावेळी आंदोलकांनी कुठल्याही परिस्थीत मुरमाणे खड्डे बुजविण्यास स्पष्ट विरोध केला व नवीन दुरूस्तीचे काम तात्काळ सुरू करण्याची मागणी केली तसे लेखी कार्यकारी अभियंता यशवंत पाटील यांच्याकडून घेतल्यानंतर आंदोलन थांबविण्यात आले. यावेळी आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी बसपाचे हरीश चक्रनारायण यांनी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रशासनावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी केली. छावाचे
रावसाहेब काळे यांनी याला जबाबदार ठेकेदार व प्रशासन असून सरकार देखील जबाबदार आहे. ठेकेदारांना प्रशासनाकडून पाठीशी घातल्याने ही अवस्था निर्माण झाली आहे. या



आंदोलनात काँग्रेसचे परिवहन विभागाचे जिल्हाध्यक्ष संदीप मोटे, अंजुम पटेल, विनोद साळवे, श्रीधर शेलार, दत्ता वामन, सुभाष काकडे, सुमित पटारे, इरफान शेख , संजय वाघमारे आदी उपस्थित होते.

*चौकट*- अहिल्यानगर ते वडाळापर्यंत पन्नास किलोमीटरचा महामार्ग राज्य पायाभूत विकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला होता परंतु महामंडळाने हा मार्ग ताब्यात घेण्यास टाळाटाळ केली यामुळे दुरुस्तीचे काम विकासकास देण्यास विलंब झाला परंतु आता दोनच दिवसात डांबरीकरण सुरू केले जाईल - यशवंत पाटील कार्यकारी अभियंता, जागतिक बँक

*चौकट* - निर्दयी शासन व प्रशासन यांना जनतेच्या सुरक्षेचे काहीही देणेघेणे उरले नाही नागरिकांचा जीवाशी हे दोन्ही नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत आहेत. आता यांना नागरिकांनी धडा शिकवला पाहिजे - संभाजी माळवदे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.

## खारघर वाहतूक शाखेमार्फत रिक्षाचालकांचे प्रबोधन

दैनिक युवक आधार संतोष आमले
खारघर वाहतूक शाखेमार्फत टाटा हॉस्पिटल रिक्षा स्टॅन्ड येथे रिक्षाचालकांसाठी प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. दुपारी 12 ते 12.15 या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात सुमारे 10 ते 12 रिक्षाचालक सहभागी झाले. या प्रबोधनामध्ये चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. वाहन चालवताना गणवेश परिधान करणे, नागरिकांशी सौजन्यपूर्ण वर्तन राखणे, वाहतुकीस अडथळा होणार नाही अशा प्रकारे वाहन पार्क करणे याबाबत सूचना करण्यात आल्या. तसेच मद्यपान करून वाहन चालविण्याचे दुष्परिणाम, भरधाव वेगाने गाडी चालविण्याची धोकेदायक प्रवृत्ती, अतिरिक्त प्रवासी न घेणे व वाहनाची कागदपत्रे अद्ययावत ठेवणे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे मार्गदर्शन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शेख साहेब (वाहतूक शाखा, खारघर) यांच्या मार्गदर्शनाखाली Gr. PSI शिदोरे व PC/3853 गुरव यांनी केले.



# ‘यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थे’चा सत्कार मी आयुष्यभर विसरणार नाही : अशोक सराफ

### चाहत्यांच्या तुफान गर्दीत अशोक सराफ यांचा उलव्यात भव्य नागरी सत्कार ! ‘बहुरूपी अशोक’च्या मेजवानीने रसिक मंत्रमुग्ध !

दैनिक युवक आधार
उलवे प्रतिनिधी
"आज जी काही माझी अभिनय क्षेत्रात वाटचाल सुरू आहे ती केवळ रसिकांमुळेच! रसिक प्रेक्षक माझे मायबाप आहेत. माझ्या आयुष्यात निवेदिता आली आणि आयुष्यच उजळून गेले. सर्वांनाच अशा बायका मिळतात असे नाही. मी रसिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे काम प्रामाणिकपणे केले, मला महाराष्ट्राच्या जनतेने भरभरून प्रेम दिले. या पूर्वी माझे अनेक सत्कार झालेत, पण उलव्यातील यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थे'मार्फत झालेला नागरी सत्कार मी आयुष्यभर विसरणार नाही. त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांच्याही प्रेमात मी पडलोय," असे 'पद्मश्री' आणि 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारप्राप्त अशोक सराफ नागरी सत्काराला उत्तर देताना म्हणाले. मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते, अभिनयाचे बादशहा अशोक सराफ यांचा चाहत्यांच्या तुफान गर्दीत उलव्यातील 'भूमिपुत्र भवन' येथे रविवारी सपत्निक भव्य नागरी सत्कार सोहळा झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नरेंद्र बेडेकर निर्मित 'बहुरूपी अशोक'च्या मेजवानीने रसिक मंत्रमुग्ध झाले होते. हा नागरी सत्कार समारंभ यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेने आयोजित केला होता. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि आंध्र प्रदेशचे माजी राज्यपाल सुशीलकुमार शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, रायगडचे खासदार सुनील तटकरे, माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि आंध्र प्रदेशचे माजी राज्यपाल सुशीलकुमार शिंदे, माजी खासदार रामशेठ ठाकूर उपस्थित होते. अशोक सराफ यांच्यावर प्रेम करणारे चाहत्यांनी तुफान गर्दी केल्याने 'भूमिपुत्र भवन' खचाखच भरले होते. यावेळी अशोक मामांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात सलामी दिली. रायगडचे खासदार सुनील तटकरे म्हणाले, "अशोक सराफ यांच्यासारखा कलाकार पुन्हा होणे नाही. त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळायला हवा. आम्हालाही राजकारणात रोज नवनवीन भूमिका कराव्या लागतात. अशा सर्व कलाकार मंडळींना एकत्र आणण्याचे काम महेंद्रशेठ घरत यांनी केले. ही किमया केवळ महेंद्र शेठ हेच करू शकतात."

> “कलेवर मी प्रेम करतो. नाटक, चित्रपट, क्रिकेट यांची मलाही आवड आहे. कला जिवंत राहावी, तिला चांगले व्यासपीठ मिळावे, म्हणून ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्यासारख्या दिग्गज अभिनेत्याला उलवे नगरीत आणले. रसिकांच्या तुडुंब गर्दीत आज त्यांना ‘याचि देही याचि डोळा’ सर्वांनी पाहिल्याने मलाही मनस्वी आनंद झाला. त्यांना मानाचा मुजरा करतो.”
>
> – महेंद्रशेठ घरत, आंतरराष्ट्रीय कामगार नेते.

रामशेठ ठाकूर म्हणाले, " आम्ही आजही अशोक सराफ यांचे चित्रपट आणि सिरीयल बघत असतो. महेंद्रशेठ माझा शिष्य नाही तर भाऊ आहे, असे मी मानतो." माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे



म्हणाले, "अशोक सराफ यांनी महाराष्ट्रीयन जनतेला खळखळून हसविले. रायगडसाठी लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे योगदान खूप मोठे आहे. रोखठोक बोलण्याची ते नेहमी तयारी ठेवायचे. ज्यावेळी साडेबारा टक्क्यासाठी गोळीबार झाला त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनाही त्यांनी सोडले नाही. सांस्कृतिक मंत्री असताना चित्रपट सृष्टीसाठी खूप मोठे योगदान मी दिले आहे. महेंद्र घरत गुणवत्ता असूनही राजकारणामध्ये थोडे मागे राहिले, त्यांना योग्य स्थान मिळायला हवे."

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, "अशोक सराफ यांचे चित्रपटसृष्टीसाठी योगदान खूप मोठे आहे. रसिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत ते आजही काम करत आहेत. निवेदिता सराफ यांचे अशोक सराफ यांच्या जीवनामध्ये खूप मोठे योगदान आहे. तसेच महेंद्र घरत यांनी मनामध्ये ठरवले तर ते काहीही करू शकतात. एकाच व्यासपीठावर अनेक पक्षातील नेत्यांना एकत्र आणण्याचे काम तेच करू शकतात." यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "भूमिपुत्र भवनाच्या निर्मितीत माझा सिंहाचा वाटा आहे. उरणचे हुतात्मा स्मारकाची मागणी केली, भूखंड आरक्षित झाला, पण खारफुटीत अडकला. आता तो उभारण्याबाबत मान्यवर मंडळींनी प्रयत्न करावेत." यावेळी शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, साई मंदिर वहाळचे संस्थापक रविशेठ पाटील, शिवसेनेचे बबनदादा पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, मिलिंद पाडगावकर, माजी जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील, विनोद म्हात्रे, गोपाल पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शेलघर येथील यमुना सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि सचिव सौ. शुभांगीताई घरत यांनी रायगड, नवी मुंबईच्या नागरिकांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन केले होते.



# निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## कळमेश्वर तालुक्यात शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना दिला धीर , राज्यातील एकही शेतकरी मदतीपासून वंचीत राहणार नाही

दैनिक युवक आधार
सतीश कडू संपादक नागपूर विभाग

नागपूर,दि. 29 : गत पन्नास वर्षात शेतकऱ्यांचे पावसामुळे जेवढे नुकसान झाले नसेल तेवढे नुकसान राज्यात सप्टेंबर अखेरपर्यंत झालेल्या पावसाने झाले आहे. मराठवाड्यासह राज्यातील अनेक भाग उध्वस्त झाले आहेत. राज्याच्या प्रत्येक भागात शासन शेताच्या बांधावर जावून पंचनामे करीत आहे. या संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळप्रसंगी ड्रोनच्या सहाय्याने व याचबरोबर प्रत्यक्ष पंचनाम्याच्या माध्यमातून अधिकाधिक मदत केली जाईल, असे सांगितले आहे. आम्ही वेळप्रसंगी निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करू असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यात असलेल्या मौजा दाढेरा, तिडंगी, तेलगाव, नांदा गोमुख व जिल्ह्यातील इतर गावांतील कृषी क्षेत्राची त्यांनी पाहणी केली. या गावातील संत्रा, सोयाबीन, कापूस,



तूर, भाजीपाला-वेलवर्गीय पिके उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर भेटून पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी धीर दिला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शासकीय यंत्रणेत पंचनाम्याप्रमाणे शेतकऱ्यापर्यंत मदत पोहचविली जाते. पंचनामे करतांना कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश महसूल विभागाला दिले आहेत. या पंचनाम्यामध्ये काही चूक असल्यास ग्रामपंचायतीच्या माध्यमातून यात योग्य ती दुरुस्ती केली जाईल. कोणत्याही स्थितीत शेतकऱ्यांवर कसल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. राज्यात ऑगस्ट अखेरपर्यंत सूमारे 25 लाख व सप्टेंबर महिन्यात 22 लाख हेक्टर एवढे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. राज्यातील सर्व महसूल यंत्रणा शेताच्या बांधावर असून येत्या 5 ऑक्टोबर पर्यंत झालेल्या नुकसानीची आकडेवारी येईल. यानंतर मंत्री मंडळस्तरावर व्यापक विचार विनिमय करुन शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय जाहीर केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. आज शहरांमध्ये सिमेंटचे रस्ते झाल्याने शहरामध्ये पाणी साचते आहे. यादृष्टीने विचार करुन शहरात जल निस्सारण व मल निस्सारण आणि ग्रामीण भागामध्ये जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांच्या माध्यमातून मातीची धूप कमी व्हावी, पूराचा धोका कमी व्हावा यावर भर देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

## एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी धनगर समाजाचे आमदार-खासदारांच्या दारी "ढोल वाजवत आंदोलन"

**दैनिक युवक आधार**
***धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार***

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी राज्यभर धनगर समाज वेळोवेळी आंदोलन करत आहे. त्याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. धनगर समाजाच्या जमातीला लागू असलेले आरक्षण संदर्भात अंमलबजावणी करावी. तसेच घटनेत



असलेले एसटी प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यात यावे यासाठी जालना येथे 13 दिवसापासून उपोषण करीत असलेले दीपक बोऱ्हाडे यांना पाठींबा देण्यासाठी व त्यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी. यासाठी तालुका धनगर समाजाच्या वतीने नायगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेश पवार व लोकसभा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या घरासमोर ढोल वाजवून आंदोलन करून त्यांना निवेदन देण्यात आले. तसेच आगामी काळात आंदोलन तीव्र करण्याच्या इशारा देण्यात आला. धनगर समाजाला तात्काळ एस.टी. प्रवर्गातील आरक्षण देण्यात यावे अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. २ दिवसांत दिपक बोऱ्हाडे यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास १ ऑक्टोबररोजी रस्त्यावर उतरून नांदेड जिल्ह्यात रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. पुढील आंदोलनाची दिशा दिपक बोऱ्हाडे सांगतील त्या पद्धतीने राहणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. यानंतर आपल्या मागण्यांचे निवेदन आमदार व खासदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. यावेळी समाज बांधवांच्या वतीने यळकोट येळकोट 'जय मल्हार , धनगर एस.टी आरक्षण अंबलबजावणी झालीच पाहिजे , धनगर एकजुटीचा' विजय असो, अशा घोषणा देत आहेत. धर्माबाद येथील शेकडो धनगर समाज बांधव या ठिकाणी उपस्थित आहे.

## स्मॉल वंडर शाळेत दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे

धडकी:- शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि नवनिर्मिती उपक्रम विद्यार्थ्यांनी करावे यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाच्या आदेशानुसार शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन आदेश करण्यात आले होते स्मॉल वंडर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज वडकी येथे वर्ग पाच ते बारा च्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रयोग सादर केले प्रमुख अतिथी समाजसेविका विद्याताई लाड संस्थेचे सदस्य गंभीररावजी



भोयर यांनी प्रदर्शनाला भेट दिली.प्रदर्शनीत सर्वोत्तम पहिल्या तीन प्रयोगांना बक्षीस देण्यात आले.विद्यार्थ्यांच्या पालकांनी उत्साहाने विद्यार्थी प्रोजेक्टची पाहणी केली व विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला . विज्ञान विषयाची गोडी तयार होईल आणि नवीन संशोधनास वाटा मोकळ्या होतील असा आशावाद महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ मंजुषा सागर यांनी प्रतिपादित केले. उपस्थित प्रमुख अतिथी तसेच विज्ञान विषयाचे शिक्षक नितीन गवळी यांनी विज्ञान प्रदर्शन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. ४२ मॉडेल्स विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीत सादर केले होते.प्राथमिक माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांनीही प्रदर्शनीस भेट दिली.विज्ञान प्रदर्शनीच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक अहमद शेख,नीता फुटाणे,शंकर मालखेडे,प्रेम इंगोले,शनु शेख,दिपाली दैवलकर,विजय फुलकर,पुष्पक मोहरले,कोयल मुरखे,सीमा झोटिंग, अक्षय वानखेडे तसेच इतर सर्व शिक्षक वर्गाच्या सहकार्याने दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनी यशस्वीरित्या पार पडले.

## NCDEX सोबत रिसोड बाजार समितीची बैठक संपन्न

दैनिक युवक आधार
वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे

रिसोड हळद खरेदी विक्री आणि हळदीचे सेबी अंतर्गत चालणारे फ्युचर सौदे आणि भावासंदर्भात NCDEX अंतर्गत एकूणच चालणाऱ्या व्यवहारा बाबत मागील काळात काही व्यापाऱ्यांच्या आणि वेअर हाऊस कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे शतकरी आणि छोट्या व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून या सर्व बाबींसाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे सतत पत्रे आणि पाठपुरावा करण्यात आला होता.सेबी आणि सरकारच्या हस्तक्षेपामुळे हळद गोदामची चौकसी करण्यात आली.आज नागपूर येथील आमदार निवसात nic-dex व रिसोड कृ.उ.बा समितीत बैठक संपन्न झाली.शेतकऱ्यांचा हळदीला भाव मिळवून देण्यासाठी उपाय योजना



करणे, रिसोडला हळद साठवण्या गोदाम घेणे,हळद खरेदीतील नियम सिथील करणे,ncdex कडुन राज्यातील विक्रमी हळदीचे सौदे घेणाऱ्या बाजार समित्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कडे पाठपुरावा करणे. वरील विषयावर चर्चा करण्यात आली.बैठकीसाठी ncdex कडुन CEO केदार देशपांडे साहेब,यादव साहेब आणि रिसोड कृ.उ.बा.सामीतिचे सभापती तथा भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर,गजाननराव पाचरणे, भाऊराव पाटील गरड,एड. गजानन आवताडे,रमेश गायकवाड,एड.मदन जाधव, सतीश मांदळे,उद्धव भुतेकर यांची उपस्थिती होती.

## महामार्ग दुरुस्तीसाठी काँग्रेस आक्रमक जागतिक बँकेच्या कार्यालयास टाळे ठोकुण धरणे आंदोलन

दैनिक युवक आधार
नेवासा प्रतिनिधी:- लखन वाल्हेकर

अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गाची खड्डे पडून झालेली दुरावस्था व या महामार्गाच्या देखभालीची जबाबदारी असणारे जागतिक बँकेचे प्रशासनाचे दुर्लक्ष याविरोधात आज काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत जागतिक बँकेच्या कार्यालयास टाळे ठोकुण त्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. परंतु आंदोलनाची तात्काळ दखल घेत कार्यकारी अभियंता यांनी दोनच दिवसामध्ये डांबराने खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले जाईल असे स्पष्ट करत अहिल्यानगर ते घोडेगाव या कामाची तातडीने वर्क ऑर्डर काढण्यात आली असून. घोडेगाव ते वडाळा या दरम्यानच्या दुरुस्तीची वर्कऑर्डर दोन दिवसात काढून डांबर व खडीने खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले जाईल असे स्पष्ट केले.

यावेळी आंदोलकांनी कुठल्याही परिस्थीत मुरमाणे खड्डे बुजविण्यास स्पष्ट विरोध केला व नवीन दुरूस्तीचे काम तात्काळ सुरू करण्याची मागणी केली तसे लेखी कार्यकारी अभियंता यशवंत पाटील यांच्याकडून घेतल्यानंतर आंदोलन थांबविण्यात आले. यावेळी आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी बसपाचे हरीश चक्रनारायण यांनी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रशासनावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी केली. छावाचे

रावसाहेब काळे यांनी याला जबाबदार ठेकेदार व प्रशासन असून सरकार देखील जबाबदार आहे. ठेकेदारांना प्रशासनाकडून पाठीशी घातल्याने ही अवस्था निर्माण झाली आहे. या

आंदोलनात काँग्रेसचे परिवहन विभागाचे जिल्हाध्यक्ष संदीप मोटे, अंजुम पटेल, विनोद साळवे, श्रीधर शेलार, दत्ता वामन, सुभाष काकडे, सुमित पटारे, इरफान शेख , संजय वाघमारे आदी उपस्थित होते.

*चौकट*- अहिल्यानगर ते वडाळापर्यंत पन्नास किलोमीटरचा महामार्ग राज्य पायाभूत विकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला होता परंतु महामंडळाने हा मार्ग ताब्यात घेण्यास टाळाटाळ केली यामुळे दुरुस्तीचे काम विकासकास देण्यास विलंब झाला परंतु आता दोनच दिवसात डांबरीकरण सुरू केले जाईल - यशवंत पाटील कार्यकारी अभियंता, जागतिक बँक

*चौकट* - निर्दयी शासन व प्रशासन यांना जनतेच्या सुरक्षेचे काहीही देणेघेणे उरले नाही नागरिकांचा जीवाशी हे दोन्ही नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत आहेत. आता यांना नागरिकांनी धडा शिकवला पाहिजे - संभाजी माळवदे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.

## एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी धनगर समाजाचे आमदार-खासदारांच्या दारी "ढोल वाजवत आंदोलन"

नांदेड लोकसभेचे खासदार मा. रवींद्र चव्हाण यांचा आरक्षणाला जाहीर पाठिंबा असल्याचे दिले पत्रक



दैनिक युवक आधार
*धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी राज्यभर धनगर समाज वेळोवेळी आंदोलन करत आहे. त्याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. धनगर समाजाच्या जमातीला लागू असलेले आरक्षण संदर्भात अंमलबजावणी करावी. तसेच घटनेत असलेले एसटी प्रवर्गाचे आरक्षण लागू करण्यात यावे यासाठी जालना येथे 13 दिवसापासून उपोषण करीत असलेले दीपक बोऱ्हाडे यांना पाठींबा देण्यासाठी व त्यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी. यासाठी तालुका धनगर समाजाच्या वतीने नायगाव विधानसभा मतदारसंघातील आमदार राजेश पवार व लोकसभा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या घरासमोर ढोल वाजवून आंदोलन करून त्यांना निवेदन देण्यात आले. तसेच आगामी काळात आंदोलन तीव्र करण्याच्या इशारा देण्यात आला. धनगर समाजाला तात्काळ एस.टी. प्रवर्गातील आरक्षण देण्यात यावे अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. २ दिवसांत दिपक बोऱ्हाडे यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास १ ऑक्टोबररोजी रस्त्यावर उतरून नांदेड जिल्ह्यात रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. पुढील आंदोलनाची दिशा दिपक बोऱ्हाडे सांगतील त्या पद्धतीने राहणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. यानंतर आपल्या मागण्यांचे निवेदन आमदार व खासदार यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. यावेळी समाज बांधवांच्या वतीने यळकोट येळकोट 'जय मल्हार , धनगर एस.टी आरक्षण अंबलबजावणी झालीच पाहिजे , धनगर एकजुटीचा' विजय असो, अशा घोषणा देत आहेत. धर्माबाद येथील शेकडो धनगर समाज बांधव या ठिकाणी उपस्थित आहे.

## वाहेगाव (सातारा) येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बाजीराव गोरे यांना बदली निमित निरोप....

**विद्यार्थ्यांना अश्रू अनावर.**
**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाहेगाव येथील मुख्याध्यापक बाजीराव गोरे यांची प्रशासकीय बदली झाल्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थ वाहेगाव (सातारा)यांनी आदर्श असा निरोप समारंभ आयोजित केला होता या प्रसंगी ग्रामस्थांच्या वतीने मुख्याध्यापक बाजीराव गोरे व त्यांची पत्नी डॉ.अनुजा गोरे (बिनगे)यांचा सत्कार सर्व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आला.मुख्याध्यापक बाजीराव गोरे हे जून-2018 पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते. त्यांच्या या बदलीने प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यात अश्रू आले, काही विद्यार्थी तर ओक्सा-बोक्षी रडू लागले आपले लाडके शिक्षक आपल्याला सोडून दुसऱ्या गावात जाणार हे त्यांना सहन होत नवते. आपल्या लाडक्या शिक्षकाला निरोप देत असताना त्यांचे अश्रू अनावर झाले होते.कार्यक्रमाच्या ठिकाणी अतिशय भावनिक असे वातावरण तयार झाले होते.मुख्याध्यापक बाजीराव गोरे यांनी आपल्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या मुलाप्रमाणे शिक्षण देऊन, संस्कार लावून, गावातील मुलांमध्ये,गावामध्ये खूप चांगले शैक्षणिक कार्य घडवून आणले आहे.ग्रामस्थानी बाजीराव गोरे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा



दिल्या तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाहेगाव येथे नूतन मुख्याध्यापक म्हणून रुजू झालेले व आष्टी, कोकाटे हादगाव सर्कल परिसरातील वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत पाईक श्री. ह.भ.प.सोनळकर महाराज यांना पुढील कार्यास खूप खूप शुभेच्या दिल्या.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास पौळ सर तर प्रास्ताविक मनोज काटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील रामेश्वर काटे, अशोक काटे, कृष्णा काटे नवनाथ काटे रंगनाथ काटे यांच्यासह गावकऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील सरपंच, उप सरपंच, प्रतिष्ठित नागरिक व शालेय व्यवस्थापन समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पिलीव परिसरात नवरात्रोत्सवास भाविक भक्तांचा प्रचंड प्रतिसाद

दैनिक युवक आधार पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :-माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी सालाबाद प्रमाणे श्री सिद्धिविनायक नवरात्र महोत्सव मंडळ पिलीव, श्रीराम दुर्गामाता नवरात्र मंडळ श्रीराम गल्ली पिलीव, श्री दुर्गा माता नवरात्र मंडळ तावरे निवास पिलीव, श्री. महालक्ष्मी नवरात्र मंडळ लोहार गल्ली पिलीव, श्री चौंडेश्वरी दुर्गामाता नवरात्र मंडळ चौंडेश्वरी मंदिर व श्री दुर्गा माता नवरात्र मंडळ रोकडे वाड्यातील मंदिर पिलीव, श्री दुर्गा माता नवरात्र मंडळ सरवदे निवास, श्री दुर्गामाता नवरात्र मंडळ एसटी स्टँड पिलीव, श्री तुळजाभवानी नवरात्र मंडळ गुजरे मळा, श्री दुर्गामाता नवरात्र मंडळ नवले मळा, श्री भवानी आई नवरात्र मंडळ (जहागीरदार मळा), श्री महालक्ष्मी नवरात्र मंडळ जवाहरलाल विद्यालय नजीक (श्री महालक्ष्मी मंदिर), श्री महालक्ष्मी नवरात्र मंडळ बगाडे वस्ती श्री महालक्ष्मी मंदिर, श्री यमाईदेवी नवरात्र मंडळ (यमाई मंदिर बोडरे वस्ती), सटवाई मंदिर, मरीआई मंदिर (बाजार तळा नजीक), श्री भवानी मंदिर (तळ्यातली आई), श्री महालक्ष्मी मंदिर (कपने गल्ली) तसेच अनेक मंदिरामध्ये व घरगुती स्वरूपामध्ये मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने घटस्थापना करून नवरात्र उत्सव अतिशय भक्ती भावाने तर अनेक ठिकाणी विद्युत रोषणाई करून त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी मंडपाची मोठ्या प्रमाणामध्ये सजावट करून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करून "आई राजा उदो उदो"च्या गजरात व जयघोषा मध्ये नवरात्रोत्सव साजरा केला जात आहे. त्याचप्रमाणे बचेरी या ठिकाणीही भवानी



मंदिर मायाक्का मंदिर अनेक मंदिरांमध्ये व सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळातर्फे व घरगुती स्वरूपातही नवरात्र उत्सव साजरा केला जात आहे. शिंगोर्णी या ठिकाणीही सार्वजनिक नवरात्र मंडळातर्फे व घरगुती स्वरूपात व अनेक मंदिरांमध्ये त्याचप्रमाणे कोळेगाव, फळवणी, काळमवाडी, कुसुमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी, तांदुळवाडी, भाळवणी, साळमुख, मळवली या ठिकाणीही अतिशय भक्तिमय वातावरणामध्ये सार्वजनिक मंडळे त्याचप्रमाणे अनेक मंदिरात आणि घरगुती स्वरूपात सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके, शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते) या जयघोषामध्ये भक्तिमय वातावरणामध्ये पिलीव व पिलीव परिसरामध्ये नवरात्र उत्सव साजरा केला जात आहे. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र औंधची आई, तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी व अनेक तीर्थक्षेत्रामधून ज्यांना शक्य आहे तेथून ज्योत आणण्याचे नियोजन करीत असल्याचे समजते .

**दैनिक युवक आधार**
**हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR**
**Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# शेतकऱ्यांचा इशारा: २ ऑक्टोबरला विनता नदीपात्रात जलसमाधी घेण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड तालुक्यातील उगांव, शिवडी, खेडे, सोनेवाडी, वनसगांव परिसरात झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे कांदा, मका, टोमॅटो, कारले, द्राक्षबागा आणि इतर पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पंचनाम्याचा केवळ दिखावा न करता शासनाने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अन्यथा गांधी जयंतीच्या दिवशी, म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी, विनता नदीपात्रात जलसमाधी घेण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. उगांव येथे झालेल्या बैठकीत किसान करणी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मधुकर ढोमसे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांनी एकवटत शासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला. यावेळी माजी चेअरमन दत्तात्रय सुडके, द्राक्ष बागाईतदार संघाचे संचालक रामनाथ शिंदे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त करत शासनाच्या उदासीनतेवर टीका केली. शासनाने ओला दुष्काळ तात्काळ जाहीर न केल्यास आणि सरसकट कर्जमाफीचा निर्णय न घेतल्यास, शेतकरी आत्महत्या करण्याच्या उंबरठ्यावर पोहचतील, असा गंभीर इशाराही यावेळी देण्यात आला. या बैठकीस परिसरातील अनेक प्रमुख शेतकरी, स्थानिक नेते, संस्था पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'ओला दुष्काळ जाहीर झाला पाहिजे – कर्जमाफी झालीच पाहिजे' अशा घोषणांनी उगांव परिसर दणाणून गेला.

# म्हसळा शहरात होळी पटांगण सुशोभीकरणाचे भूमिपूजन व कुणबी समाज सभागृहाचे भव्य उद्घाटन

दैनिक युवक आधार
म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ–

म्हसळा शहरात सामाजिक व विकासात्मक कामांचा शुभारंभ मोठ्या उत्साहात झाला. हिंदु समाज होळी पटांगणाच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन तसेच म्हसळा तालुका कुणबी समाज पश्चिम (तळवडे) विभागाच्या मध्यवर्ती सामाजिक सभागृहाचे उद्घाटन अशा दोन महत्त्वाच्या उपक्रमांना एकाच दिवशी सुरुवात झाली. या कार्यक्रमांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष, माजी मंत्री, कोकणचे भाग्यविधाते व रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार तसेच चेअरमन – पेट्रोलियम व नॅचरल गॅस मा. सुनीलजी तटकरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या सोबत म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष समीरजी बनकरही उपस्थित होते. होळी पटांगण सुशोभीकरण भूमिपूजन म्हसळा शहरातील हिंदु समाज होळी पटांगण सुशोभीकरण कामाच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी म्हसळा हिंदु समाजाचे अध्यक्ष नंदकुमार गोवीलकर, सचिव सुनील यादव,



कार्यकारिणी सदस्य सुनील उमरोटकर, सुनील आंजार्लेकर, ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे, म्हसळा नगरपंचायत उपनगराध्यक्ष अनिकेत पानसरे तसेच स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी खासदार सुनील तटकरे म्हणाले, “परंपरा व संस्कृती जपण्याबरोबरच समाजाच्या सुविधा वाढविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून देण्याचा आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. या पटांगणाचे सुशोभीकरण पूर्ण झाल्यानंतर सर्व धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी हे एक सुंदर स्थळ बनेल.” कुणबी समाज सभागृहाचे उद्घाटन यानंतर मौजे पानवे येथे म्हसळा तालुका कुणबी समाज पश्चिम (तळवडे) विभागाच्या मध्यवर्ती सामाजिक सभागृहाचे उद्घाटन मा. खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले. सभागृहामुळे समाजातील शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांना नवे व्यासपीठ मिळेल, अशी अपेक्षा खासदार तटकरे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी तहसीलदार सचिन खाडे, पोलीस निरीक्षक संदीप कहाले, गटविकास अधिकारी माधव जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तालुकाध्यक्ष समीरजी बनकर, जिल्हा चिटणीस महादेव पाटील, कुणबी समाज अध्यक्ष महादेव पाटील, सचिव महेश पवार, युवानेते अनिल काप आदी मान्यवर उपस्थित होते. सुरई येथील पक्षप्रवेश सोहळा त्याच दिवशी सुरई येथील बुद्धवाडी येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात स्थानिक नागरिक व कार्यकर्त्यांनी मा. खासदारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नवागत कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शिस्तबद्ध नियोजन व उत्स्फूर्त प्रतिसाद या सर्व कार्यक्रमांचे नियोजन म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी काटेकोर व शिस्तबद्ध पद्धतीने केले. महिला व पुरुष नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहिल्याने कार्यक्रमांना उत्सवी स्वरूप लाभले

# त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर हल्ला;

## दोषींवर कठोर कारवाईची पत्रकार संरक्षण समितीची मागणी

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः– जितेंद्र खोडे



राळेगावः–आज दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन देण्यात आले, त्र्यंबकेश्वर येथे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ, पत्रकार संरक्षण समिती राळेगावच्या वतीने जाहीर निषेध केला,या हल्ल्यातील सर्व दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.२० सप्टेंबर २०२५ रोजी 'झी २४ तास'चे ब्युरो चीफ योगेश खरे, 'साम टीव्ही'चे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे आणि 'पुढारी न्यूज'चे ब्युरो चीफ किरण ताजने यांच्यावर गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी हल्ला केला. या हल्ल्यात ताजने गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. हा हल्ला म्हणजे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेला आघात आहे, असे निवेदनात म्हटले आहे.या घटनेमुळे पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्ल्यातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात असे हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी ठोस धोरण जाहीर करावे आणि प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार संरक्षणासाठी विशेष सेल स्थापन करावा, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या,समाजातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या, प्रश्न आणि सत्य परिस्थिती लोकांसमोर आणण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकारितेमुळे होत असते. मात्र अलीकडच्या काळात पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर स्वरूपात उभा राहिला आहे.या अमानुष घटनेचा आम्ही पत्रकार संरक्षण समिती संघाचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे व जिल्हा सहसचिव कविताताई धुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संरक्षण समिती संघाच्या वतीने तीव्र निषेध करीत आहोत. पत्रकारांवर हल्ला करणे म्हणजे लोकशाहीच्या पायावर आघात करण्यासारखे आहे. त्यामुळे या गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कठोरातील कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून भविष्यात कोणीही पत्रकारांवर हल्ला करण्याचे धाडस करणार नाही. यावेळी पत्रकार संरक्षण समितीच्या जिल्हा सहसचिव कविता धुर्वे,तालुका उपाध्यक्ष कैलास कोडापे,सचिव जितेंद्र खोडे,नरेश राऊत,लोकेश दिवे सदस्य उपस्थित होते.

# निफाड तालुक्यात आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त IEC कॅम्पेन

दैनिक युवक आधार
नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी




निफाड : मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या आदेशानुसार व जिल्हा एड्स नियंत्रण पथकाच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपजिल्हा रुग्णालय निफाडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांच्या नेतृत्वाखाली 12 ऑगस्ट ते 30 सप्टेंबरदरम्यान आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त “स्थानिक युवकांची कृती – शाश्वत विकास उद्दिष्टांसाठी आणि त्यापलीकडे” या घोषवाक्यानुसार IEC कॅम्पेन राबविण्यात आले. या अभियानात आयसीटीसी विभागातील समुपदेशक नितीन परदेशी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ पौर्णिमा कोंडके व स्टाफ नर्स मंगला बोरसे यांनी 30 शाळा, 5 महाविद्यालये व 10 ग्रामपंचायतींमध्ये जाऊन जनजागृती केली. विद्यार्थ्यांना किशोरवयीन जीवन कौशल्य, प्रजनन व लैंगिक आरोग्य, मादक पदार्थांचे दुष्परिणाम, एचआयव्ही–एड्स व एसटीआय संदर्भातील माहिती देण्यात आली. तर महाविद्यालयीन स्तरावर मानसिक आरोग्य, एड्स संक्रमण प्रतिबंध, कलंक निर्मूलन व एचआयव्ही–एड्स कायदा 2017 याबाबत मार्गदर्शन केले. ग्रामपंचायतींमध्येही एचआयव्हीबाबत जनजागृती करत गैरसमज व भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न झाला. या अभियानातून एचआयव्ही एड्स टोल फ्री क्रमांक 1097 बाबत जागृती झाली. अभियान यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभाग, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायतीतील पदाधिकारी, शिक्षक व आरोग्यसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजाराची मदत जाहीर करा - शेतकरी कामगार पक्षाची मागणी

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :– योगेश पालोदकर

सिल्लोडः– शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आज दि. 29/09/2025 सोमवार रोजी ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी निवेदनाद्वारे मा.तहसीलदार सिल्लोड यांना करण्यात आली. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा,शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 50 हजार रुपये आर्थिक मदत करा,मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना वीस लाख रुपये आर्थिक मदत करा,पशुधनाचे झालेले नुकसान लक्षात घेऊन पशुधन खरेदीसाठी बाधीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत करा, शेतकऱ्यांचे संपूर्ण वीज बिल माफ करा,सर्व शेतकरी कर्जमुक्त करा, विद्यार्थ्यांची शालेय व महाविद्यालयीन फीस पूर्णपणे माफ करा, बँका आणि वित्तीय संस्था कडून होणारी कर्ज वसुली स्थगित करावे आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आले. महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात मे महिन्यापासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी वर्ग पुर्ता घाई मिठीत आला आहे. गेली काही दिवसापासून सततची अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे .मराठवाड्यातील शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला आहे. ढगफुटी आणि अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी माती वाहून गेल्यामुळे नापिकीचे फार मोठे संकट शेतकऱ्यासमोर उभे टाकले आहे .पुरामुळे मनुष्यहानी आणि प्रचंड प्रमाणात पशुधनांचे हानी सुद्धा झालेली आहे अशा परिस्थितीत अस्मानी संकटाला तोंड देण्यासाठी राज्य शासनाने तात्काळ मराठवाड्यात व आवश्यक असणाऱ्या सर्व ठिकाणी ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे गरजेचे आहे. म्हणून शेतकरी कामगार पक्ष शाखा सिल्लोड च्या वतीने निवेदनाद्वारे आपणास विनंती करतो की महाराष्ट्र शासनाने मराठवाड्यात तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून खालील मागण्या मान्य कराव्यात अन्यथा बळीराजाच्या न्याय हक्कासाठी शासना विरुद्ध शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. त्यानंतर उद्भवणाऱ्या सर्व परिणामास महाराष्ट्र शासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई युनूस पठाण, भाई विलास डिडोरे पाटील, भाई कलीम पठाण, भाई असलम पठाण, भाई यूसूफ प्रसाद, भाई अशोक शेजुळ, भाई मुमताज पठाण, भाई इरफान मिस्तरी, भाई शाम अकोलकर, भाई शे. खलील, भाई राम प्रसाद राजपूत, भाई रिजवान शे. भाई शमशेर पठाण, भाई अ. रहीम, भाई रबीब शाह, भाई स.जावेद, भाई वसीम पटेल, भाई अन्सार शेख, भाई मजहर पठाण, भाई शे. इस्हाक आदी उपस्थित होते.



# पालोद येथे माहिती अधिकार दिन साजरा

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :– योगेश पालोदकर

सिल्लोड : – आंतरराष्ट्रीय स्तरावर 28 सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो, मात्र यंदा दि. 28 सप्टेंबर 2025 रोजी रविवार असल्याने माहिती अधिकार दिन सोमवार दि. 29 सप्टेंबर रोजी पालोद येथील विविध कार्यकारी सेवा सह.संस्था लिमिटेड कार्यालयात साजरा करण्यात आला.

28 सप्टेंबर हा दिवस जगभरात जागतिक माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. परंतु कित्येक वर्षापासून आपल्याकडे हा माहिती अधिकार दिन कसा साजरा करायचा हेच माहीत नाही. परंतु माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समिती सिल्लोड विभागाच्या वतीने पालोद येथील विविध कार्यकारी सेवा सह.संस्था येथील कार्यालयात माहिती अधिकार दिन साजरा केला व माहिती अधिकार व कायद्याचा प्रसार व प्रचार व्हावा या उद्देशाने ग्रामस्थांसाठी माहिती अधिकार कायद्यावर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला.



यावेळी माहिती अधिकार कायदा कोणी वापरावा व कसा वापरावा आणि लोकांच्या हितासाठी कसा योग्य आहे याबद्दल माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे सिल्लोड तालुकाध्यक्ष योगेश पालोदकर यांनी मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ व कायद्याचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विविध कार्यकारी सेवा सह. संस्थेचे चेअरमन अनिल भिका पालोदकर, संचालक विठ्ठल हनुमंता पालोदकर, ज्येष्ठ नागरिक प्रभाकर माधवराव कुलकर्णी, सेल्समन कारभारी समिंद्रे, विजय डकले ,एकनाथ सपकाळ, माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलीस मित्र समितीचे तालुका अध्यक्ष योगेश पालोदकर, तालुका सचिव कृष्णा हिवरे, तालुका संघटक संदीप पंडित, तालुका सहसंघटक बाळू खरात यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गोंदेगाव-जऊळके रस्त्यावरील पूल वाहून गेल्याने शाळकरी मुलांची जीवघेणी कसरत

दैनिक युवक आधार
निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे

गोंदेगाव :–निफाड तालुक्यातील गोंदेगाव–जऊळके या रस्त्यावरील पूल मुसळधार पावसाच्या तडाख्याने वाहून गेला आहे. त्यामुळे या मार्गाने शाळा, बाजारपेठ तसेच दैनंदिन कामांसाठी जाणाऱ्या नागरिकांचे हाल झाले आहेत. मात्र सर्वात मोठी अडचण शाळकरी मुलांना सहन करावी लागत असून रोज सकाळी शाळेत जाण्यासाठी व संध्याकाळी घरी परतण्यासाठी त्यांना पाण्यातून जीव धोक्यात घालून जाण्याची वेळ आली आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या पुलावर बराच काळ दुरुस्तीचे काम झालेले नाही. पावसाचे पाणी वाढल्याने पूल कमकुवत झाला व अखेर पूर्णपणे वाहून गेला. परिणामी विद्यार्थ्यांसह शेतकरी, महिला व वयोवृद्ध यांची गैरसोय झाली आहे. ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, याबद्दल नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शाळकरी मुलांचे हाल तर अधिकच गंभीर झाले आहेत. चिमुकले शालेय गणवेशात व दप्तर पाठीवर घेऊन पाण्यातून ओलांडताना दिसतात. तरी पावसाच्या वेळी अचानक पाण्याचा वेग वाढण्याची भीती कायम असते. त्यामुळे अपघाताचा धोका टळत नाही. "दररोज मुलांना शाळेत पाठवताना भीती वाटते. त्यांचे जीव धोक्यात घालून शिक्षणासाठी त्यांना जावे लागते ही पालकांसाठी अत्यंत वेदनादायक वेळ आहे," असे एका पालकाने व्यथा मांडली. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालून या पुलाची पुनर्बांधणी करण्याची मागणी केली आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे. "आम्ही वारंवार निवेदन दिले तरी प्रतिसाद नाही. मुलांच्या सुरक्षिततेकडे कोणी लक्ष देणार का?" असा सवाल ग्रामस्थ करत आहेत. दरम्यान, जर त्वरित उपाययोजना न झाल्यास ग्रामस्थ मोठ्या आंदोलनाचा इशारा देत आहेत.



# युवा संवर्धन समिती आणि प्रियंका मल्टिसर्विसेस चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद भगतसिंग जयंती साजरी

## विद्यादेवी निवासी अपंग विद्यालय चिखली येथे शैक्षणिक साहित्य व फराळाचे वाटप

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी चिखली सिद्धार्थ धंदरे.



चिखली : स्थानिक चिखली येथील विद्यादेवी निवासी अपंग विद्यालय येथे दिनांक २८/०९/२०२५ रोजी शहीद भगतसिंग यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीचे
औचित्य साधून युवा संवर्धन समिती आणि प्रियंका मल्टिसर्विसेस यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयातील अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच फराळाचे वाटप करण्यात आले. दरवर्षी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असून या वर्षीसुद्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रियंका मल्टिसर्विसेस चे संचालक श्री. सुमेध जाधव सर यांचा मोलाचा वाटा असतो. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच भगतसिंग यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा संवर्धन समितीचे श्री. सचिन साळवे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रियंका मल्टिसर्विसेसचे संचालक सुमेध जाधव यांनी केले. विद्यार्थ्यांनो अपंगत्वावर मात करून उंच भरारी घ्या असे यावेळी सुमेध जाधव यांनी त्यांच्या प्रास्ताविकपर भाषणात सांगितले. युवा संवर्धन समितीचे सदस्य तसेच जवाहर अर्बनचे शाखा व्यवस्थापक श्री. रामदास जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण केले. यावेळी विद्यालयाचे श्री. तांबेकर सर, गायकवाड सर, विशाखा २४ न्यूजचे श्री. राहुल पवार सर, युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तसेच श्रीराम नागरी सहकारी संस्थेचे शाखा व्यवस्थापक सिद्धार्थजी धंदरे, युवा संवर्धन समितीचे श्री. अरुण भिसे तसेच प्रवीण डोंगरदिवे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सिद्धार्थ धंदरे यांनी केले.

# गोदावरी पुर परिस्थितीमुळे पांगुळ गावंला मोठे नुकसान चाळीस ते तीस गावांचा संपर्क तुटला

## अजुनही शासकीय अधिकारी फीरकले नाही शेतकरी नाराज

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**




गेवराई तालुक्यातील पांगुळ गावं कटचिंचोली भोगलगाव गोर्दि हसनापु मिरगाव असे गोदावरीच्या काठी असलेल्या गावांना पुराच्या पाण्यामुळे होणारे शेतीमालाचे फार नुकसान झाले आहे तोंडी आपल्याला घांस माती मध्य गेला आहे सरकार मायबाप यांनी तत्कालीन सर सगट पंचनामे करून बळीराजा यांना वोला दुष्काळ जाहीर करुन मदतीचा हात देणे गरजेचे आहे आज संपूर्ण महाराष्ट्रात बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे शेतकरी यांनी कर्ज काढून आपले पीक जोमात यावें म्हणून रात्री ना दिवस आपल्या डोळ्यात तेल घालून काबड कष्ट केले आहे असा पुर अजुनही कधीं आला न्हवता असे गाव खेड्यातील वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक सांगतात कोणाचा कांदा ऊस सोयाबीन पेरु कापूस मुग पुराच्या पाण्याने धुऊन निघाले आहे तरीही आमच्या भागात अजुनही शासकीय अधिकारी तलाठी ग्रामसेवक कुनिहि फीरकले नाही आता आमच्या काहीच उरलेले नाही आता फक्त उरले आमच्याकडे आमचा जिव जर सरकारने आमच्याकडे लक्ष ताबडतोब नाही दिलें तर आम्ही लेकराबाळा सगट आत्महत्या करु कारण हा एकच पर्या उरला आहे आमच्याकडे असे पांगुळ गावं ग्रामस्थ गावकरी साहेबा मुळें बाबासाहेब वनवे लक्ष्मण पवार बोंद्रे ताजोदिन शेख पांढरे भया शेख हारीभाउ कोळी शिवा पवार सुरेश येवले तसबीर शेख आणि महिला मंडळ असा कडक विशारा सरकला दिला आहे

# लबाड सरकारने शेतकऱ्याचा अंतपाहू नये खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

नांदेड – शेतकऱ्यांच्या हाका आकाशाला_ भिडल्या ओलादुष्काळ_जाहीर_ केल्याशिवाय_शांत_बसणार नाही जिल्ह्यासह मराठवाड्यात जवळपास एक महिन्यापासून पावसाने महारुद्र रूप धारण केले आहे या पावसामध्ये नांदेड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील निळा,एकरा,तळणी लिमगाव,वाढवणा,पिंपरी या अनेक गावातील शेतकऱ्याची झालेली बेहाल परिस्थिती खासदार रविंद्र चव्हाण यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहिले व सरकारला झोपेचे सोंग न घेता तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करा अशी मागणी केली.



सोबत जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, विठ्ठल पावडे,निरंजन पावडे,काँग्रेस पक्षाचे सर्व युवक काँग्रेस पदाधिकारी पूरग्रस्त शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये नवरात्र उत्सवातील ऐतिहासिक देखाव्याला प्रचंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित**

श्रीवर्धन : नवरात्र उत्सव म्हटलं की भक्तिभाव, उत्साह आणि देखाव्यांची परंपरा! यावर्षी श्रीवर्धन शहरात विविध ठिकाणी आकर्षक देखावे उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये नवतरुण मित्र मंडळ, भैरवनाथ पाखाडी या मंडळाने साकारलेला देखावा विशेष ठरला आहे. या मंडळाने पानखिंडीचा थरार – म्हणजेच बाजीप्रभू देशपांडे आणि मावळ्यांनी स्वराज्यासाठी दिलेला अद्वितीय बलिदान – अत्यंत हुबेहुब उभा केला आहे. देखावा पाहताना प्रत्येकाच्या अंगावर काटा उभा राहतो, आणि असं वाटतं की आपण प्रत्यक्ष पानखिंडीतच उभे आहोत. मावळ्यांच्या रणगर्जना, बाजीप्रभूंचं पराक्रमी व्यक्तिमत्त्व आणि स्वराज्याच्या संरक्षणासाठी दिलेला लढा, या सगळ्याची आठवण या देखाव्यातून जिवंत होते. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने केवळ धार्मिक भावनाच नव्हे तर इतिहासाची प्रेरणाही जपण्याचं कार्य मंडळाने केलं आहे, हे विशेष. श्रीवर्धनमधील नागरिक आणि पर्यटकांनी या देखाव्याला भेट द्यावी, कारण तो केवळ डोळ्यांना आनंद देणारा नसून मनात अभिमान, प्रेरणा आणि देशभक्तीची ज्वाला चेतवणारा आहे. "नवरात्र उत्सवात भक्ती, कला आणि इतिहासाचा संगम" – अशी ओळख यंदाच्या श्रीवर्धन नवरात्र उत्सवाला मिळाली आहे.



# शिवसह्याद्री सहकारी पतपेढीचे दिपप्रज्वल कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर



उरण येथील शिवसह्याद्री सहकारी पतपेढी शाखेच्या उरणचे दैनंदिन वसुली प्रतिनिधी श्री.अमृत दिनकर सोंडकर यांच्या सहकार्याने उरण तालुका परिसरातील ग्राहकाभिमुख योजनांसह शिव सह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित उरण शाखेतर्फे दीपप्रज्वलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले असता याप्रसंगी मा. नगराध्यक्षा सौ.सायली म्हात्रे यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित उद्योजक, व्यापारी, आणि पत्रकार बंधू उपस्थित होते . गेल्या ३४ वर्षात ३७ शाखांसह *दोन हजार कोटी* पर्यंतची वार्षिक उलाढाल असणाऱ्या शिव सह्याद्री सहकारी पतपेढी उरण शाखेने विविध ठेव योजनेचा दीप प्रज्वलन प्रसंगी दैनिक युवक आधारचे उरण प्रतिनिधी *उमाकांत पानसरे* यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी प्रमुख पाहुण्या मा.नगराध्यक्षा सौ.सायली म्हात्रे मॅडम यांनी पतपेढीच्या शाखा व्यवस्थापक भोसले मॅडम यांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना विविध ठेव योजनांबद्दल शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. शाखा व्यवस्थापक भोसले मॅडम यांनी जास्तीत जास्त रक्कम गुंतवणूक करण्यास आकर्षक परताव्यासोबत कसे लाभ मिळवण्याचे उपस्थितांना समजावून सांगितले.

# मा.सुशिल निंबाळकर यांना चेअरमन पदाची खुर्ची मिळाल्यापासून सोसायटीची यशस्वी वाटचाल

दैनिक युवक आधार
सणसरः– विकास क्षत्रिय

सणसर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड सणसर या संस्थेचा दिनांक 27 जून 2024 ते आजअखेर चेअरमन पदाचा पदभार स्वीकारल्यापासून पाठीमागील वर्षी मार्च 2024 संस्थेचा तोटा 1 कोटी 40 लाख रुपये एवढा होता मार्च 2025 अखेर चालू वर्षामध्ये संस्थेस रक्कम रुपये 16 लाख 9 हजार नफा झाला असून या नफ्यामधून मागील वर्षाचा तोटा वजा करण्यात आला आहे.मार्च 2024 संस्थेची बँक स्तरावर वसुली चालू वर्षी मार्च 2025 ला 76% पर्यंत आणण्याचे काम केले त्याचप्रमाणे जून 2024 सालची संस्था वसूल टक्केवारी 46% होती.. ती देखील यावर्षी जून 2025 रोजी 48%झाली आहे.. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या कार्यकाळा मध्ये कर्जमाफी होईल या अपेक्षा वरती सभासदांनी कर्ज भरण्याकडे पाठ फिरवली आहे.परिणामी संस्थांची थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढत चालली असून याचाच राज्यातील सर्व सहकारी सोसायट्यांना मोठ्या प्रमाणात बसला आहे मागील दोन वर्षात संस्थेची सलग अधोगती वाटचाल चालू होती.ती या वर्षात आम्ही थकबाकीदार सभासदांशी थेट संपर्क साधून त्यांच्याशी चर्चा करून त्यांची वसुली करून नव्याने कर्ज वाटप त्यांना देऊ केले.. याकरीता काही सभासदांनी आम्हाला चांगल्या प्रकारे सहकार्य देखील केले जी खाती वर्षानुवर्ष



थकबाकी मध्ये होती त्यांचा वसूल कसा आणता येईल यासाठी आम्हीसर्वोत्परी प्रयत्नशील राहिलो. छत्रपती कारखाना तसेच इतर बाहेर गावच्या कारखान्यांशी पत्र व्यवहार करून त्यांच्याशी संपर्क करून त्या ठिकाण जाऊन बँकेचे विकास अधिकारी वसुली अधिकारी यांचे सहकार्याने वसूल आणण्यास आम्ही यशस्वी ठरलो. याचाच परिणाम मागील दोन वर्षाच्या परिस्थितीपेक्षा यावर्षी संस्थेची प्रगती बऱ्यापैकी सुधारलेली दिसते.आज संस्थेचे भाग भांडवल 1 कोटी 77 लाख असून सभासद कर्ज 13 कोटी 82 लाख व बँक कर्ज 12 कोटी 85 लाख आहे.. तसेच बैंक कायम ठेव 75 लाख, बैंक भाग 53 लाख 52 हजार इतर संस्था भाग ५१ हजार, राखीव निधी 74 लाख 58 हजार, लाभांश निधी 21 हजार, इमारत निधी 2 लाख 34 हजार, असून सभासद एनपीए तरतूद 1 कोटी 35 लाख 81 हजार, चालू वर्षी आपणास करावी लागली आहे. ती देखील कमी करण्यासाठी व संस्था 100% करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून संस्था चांगल्या प्रकारे नफ्यामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. साधारण 165 थकबाकीदार सभासदांच्या सातबारावरती जप्ती आदेश बोजा नोंद करून पुढील कारवाई चालू आहे.. तरी या माध्यमातून आम्ही सभासदांना विनंती करत आहोत की वसुलीसाठी सहकार्य करावे आपण संस्थेस चांगले दिवस आणण्यास सहकार्य करावे असे आव्हान चेअरमन सुशील निंबाळकर यांनी केले यावेळी संस्थेचे सचिव संजय सपकळ,तुषार निंबाळकर उपस्थित होते.

# संगमेश्वर तालुकास्तरीय थालीफेक स्पर्धेत कु.आलोक कुरतडकरची बाजी



दैनिक युवक आधार
संगमेश्वरः– (प्रमोद तरळ)

सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डेचे पा.गो. महाडिक माध्यमिक विद्यालय धामापूर येथील कुमार आलोक कुरतडकर याने संगमेश्वर तालुका स्तरीय १७ वर्षे वयोगटातील मैदानी स्पर्धेतील थालीफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी कै.मीनाताई ठाकरे विद्यालय देवरुख येथे
१७ वर्ष वयोगटातील मैदानी स्पर्धा पार पडल्या यामध्ये तालुक्यातील २७ विध्यार्थी सहभागी झाले होते यामध्ये या विद्यालयातील विध्यार्थी कुमार आलोक प्रवीण कुडतरकर इयत्ता नववी याने प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल सह्याद्री शिक्षण संस्था कार्याध्यक्ष आणि चिपळूण संगमेश्वर मतदार संघांचे आमदार मा श्री शेखरजी निकम सर, सचिव महेशजी महाडिक सर, जेष्ठ संचालक मा श्री खानविलकर सर तसेच सर्व संचालक, शाळा समिती अध्यक्ष मा श्री संभाजीशेठ महाडिक, सर्व शाळा समिती सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री चंदनशिवे सर,मार्गदर्शक शिक्षक मा श्री संदीप कोदारे सर, शिक्षक पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी सर्व आजी माजी विध्यार्थी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# “पूरग्रस्त बांधवांसाठी जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे मदतीचे आवाहन”

**“महापुराच्या पाण्यानं शेतकऱ्याची पिकं वाहून गेली**

**आशा-स्वप्नं ढगांमध्ये विरून गेली,पण तरीही शेतकरी थांबला नाही. तो पुन्हा शून्यातून नव्याने उभं राहतोय. अशावेळी त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी शक्यतोपरी सर्व सहकार्य करण्यासाठी माझ्यासारख्या असंख्य लोकांनी पुढे येऊन आपले कर्तव्य बजावले पाहिजे या भावनेतून माझी जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था वस्तू स्वरूपात मदत करणारच आहे परंतु त्यासोबत अनेक दानशूर व्यक्ती आणि सेवाभावी संस्था सुद्धा यात सहभागी होत आहेत” -**

**श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे , अध्यक्ष,**
**जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था**



दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

राज्यातील अनेक भागात आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकरी ते विद्यार्थी सर्वांवरच या आपत्तीचे गंभीर परिणाम झाले असून, अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. राज्य सरकार आणि प्रशासनाकडून मदतकार्य सुरू असले तरी सामाजिक संस्थाही या संकटाच्या काळात पुढे सरसावत आहेत. याच पार्श्वभूमीवर पनवेलमधील भाजपा नेते श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या तर्फे पूरग्रस्त बांधवांना मदतीचे आवाहन करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सांगितले की, “एका वृत्तवाहिनीवरील मुलाखतीत एका लहान चिमुरडीने माझे शालेय साहित्य वाहून गेले, मला जगायचे आहे अशी साद व्यक्त केली. त्या चिमुरडीचे शब्द ऐकून मन हेलावले. अशा परिस्थितीत पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीची आज अत्यंत गरज आहे.” यासाठी संस्थेच्या माध्यमातून शालेय साहित्य, वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिली, बॅग आदी वस्तू तसेच आवश्यक जीवनोपयोगी वस्तू दान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. श्री. म्हात्रे यांनी पुढे सांगितले की, “आपल्या छोट्याशा मदतीनेही एखाद्या कुटुंबाला जगण्याची नवी दिशा मिळू शकते. चिमुरड्यांचे शिक्षण पुन्हा सुरू करण्यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.” पूरग्रस्तांना मदतीचा हात देताना पनवेल परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आले आहे.

# विद्यार्थी कवी संमेलन उत्साहात साजरे



दैनिक युवक आधार प्रतिनिधी

काव्ययोग काव्य संस्था,पुणे आयोजित विद्यार्थी कवी संमेलन उपक्रम क्र. १२ आयोजित करण्यात आला होता.हा उपक्रम म.न.पा.शाळा.पिसोळी येथे पार पडला.यावेळी कार्यक्रम अध्यक्ष शिक्षक मनोज कुमार खाटमोटे ,विशेष उपस्थिती बाल साहित्यिका सौ.वसुधा नाईक तसेच एकपात्री कलाकार प्रा. शरदचंद्र काकडे आदी मान्यवर उपस्थितीत होते. यावेळी शाळेतील १५ विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केली तसेच यातून प्रथम, द्वितीय,तृतीय क्रमांक काढण्यात आले.सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र,मेडल देण्यात आले.तसेच विजेत्या विद्यार्थ्यांना मेडल,सन्मानपत्र,अक्षरधन देऊन गौरविण्यात आले. विजेत्यांना राज्यस्तरीय कविसंमेलनात सहभाग घेता येईल, असे काव्ययोग काव्य संस्था अध्यक्ष मा. योगेश हरणे यांनी जाहीर केले. मा.योगेश हरणे यांचा वाढदिवस असल्याने शाळेला त्यांनी मायक्रोस्कोप भेट म्हणून दिली. त्यावेळी त्यांनी सांगितले की शाळेसाठी लागणारे साहित्य 'फुल ना फुलाची पाकळी 'देण्याचे कार्य प्रत्येकाने करावे.

एकपात्री कलाकार प्रा शरदचंद्र काकडे यांनी आपल्या कलेतून विद्यार्थ्यांना खळखळून हसवले.तसेच सौ वसुधा नाईक यांनी आपल्या बालकवितेतून विद्यार्थ्यांची मने जिंकली.या वेळी मिसेस काकडे देखील उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील शिक्षक आयुब शेख व शाळेतील सर्व शिक्षक तसेच योगेश हरणे,उपाध्यक्ष गौरव पुंडे तसेच सचिव तुषार पालखे यांनी केले.

# सेवाव्रती लघुपट हे जगदीश पुळेकर यांच्या आयुष्यातील महत्वाची निर्मिती - डॉ. शैलेश मोहिते

दैनिक युवक आधार मुंबई (रवींद्र मालुसरे ) :

कुष्ठरोग्यांच्या जीवनात त्यांच्या चेहऱ्यावर हसू यावे यासाठी त्या क्षेत्रात वैद्यकीय सेवा देणाऱ्यांना एके काळी मोठा त्याग करावा लागत असे,समाजात विशिष्ट्य पद्धतीने विशेषतः दुर्लक्षित घटकांतील रुग्णांसाठी काम करताना डॉ. विजयकुमार डोंगरे यांनी आयुष्याला झोकून दिले होते. डोंगरे सरांचे काम जगासमोर येणे आवश्यक होते, समाजातील कोणताही एक विषय घेऊन त्यासाठी सर्वस्व कसे वाहून देता येते असे अनेक विषय आहेत. परंतु जगाला भेडसावणारा हा प्रश्न किती महत्वाचा आहे हे ओळखून जगदीश पुळेकर यांनी ही डॉक्युमेंट्री तयार करून सामाजिक भान जागवणारी उत्तम कमगिरी केली आहे असे उदगार नायर रुग्णालय अधिष्ठदाता डॉ शैलेश मोहिते यांनी काढले. रुग्णसेवा हीच खरी सेवा साधना मानणाऱ्या आणि अनेक दशकं ग्रामीण व शहरी कुष्टरोग निवारण आणि रुग्णसेवेसाठी झटणारे, देशा-परदेशात कॉन्फरन्समध्ये सहभागी होणारे व या विषयावरील ६० पुस्तकांचे लेखक दादर मधील पद्मश्री डॉ. विजयकुमार डोंगरे यांचा जीवनप्रवास आणि असामान्य कार्यावर आधारित ३५ मिनिटांचा लघुपट "सेवाव्रती" चा विशेष प्रीमियर शो दादर सार्वजनिक वाचनालय आणि काशिनाथ धुरु हॉल ट्रस्ट व मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई यांच्या संयुक्त वतीने दासावा मध्ये निमंत्रितांसाठी मोफत आयोजित केला होता त्यावेळी डॉ. मोहिते बोलत होते. फिल्म डिव्हिजन मध्ये प्रदीर्घ कारकीर्द गाजवलेले जगदीश पुळेकर हे या लघुपटाचे क्रिएटिव्ह हेड असून त्यांनीच लेखन, दिग्दर्शन व निर्मितीही केली आहे. यावेळी गायकवाड इन्स्टिटयूटचे डॉ. हेमंतराजे गायकवाड म्हणाले की, डॉ. डोंगरे यांना मी वैद्यकीय क्षेत्रातील माझे गुरु मानतो. निस्वार्थी भावनेने रुग्णांसाठी अहोरात्र ते कसे जगायचे याचा मी साक्षीदार आहे. रुग्णसेवा हाच खरा मानवतेचा धर्म आहे व त्यासाठी आर्थिक कमाई दुय्यम मानून त्यासाठीच त्यांनी आयुष्य वेचले. यासाठी त्यांच्या कुटुंबियांनी मोलाची साथ दिली हे सुद्धा तेवढेच मी



महत्वाचे मानतो. मुंबई लेप्रसी प्रोजेक्ट संस्थेचे डायरेक्टर डॉ. विवेक पै आपल्या भाषणात म्हणाले की, मुंबई लेप्रसी संस्थेची स्थापना १९७६ मध्ये डॉ डोंगरे यांनी केली. आमच्या दोन्ही संस्थापक डॉक्टरांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने गौरविले आहे. म्हणजेच कुष्ठरोग निवारण कामाविषयी सरकारी पातळीवर किती महत्व आणि आस्था आहे हे दिसून येते. काही वर्षांपूर्वी बाधित व्यक्तींच्या घृणास्पद स्वरूपाबद्दल समाजाचा प्रतिसाद नाकारण्याचा होता आणि तो रुग्णांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यापर्यंत पोहोचला होता. परंतु आता कुष्ठरोग शोध मोहीम, उपचार आणि निर्मूलन या त्रिसूत्रीवर आरोग्य विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. २०२३ मध्ये, भारत सरकारने राष्ट्रीय धोरणात्मक योजना (एनएसपी) आणि कुष्ठरोगासाठी रोडमॅप (२०२३-२७) सुरू केला जेणेकरून २०२७ पर्यंत या आजाराचा संसर्ग शून्य करण्याचे उदिष्टय आहे. डॉ. प्रीतम पाठारे आपल्या भाषणात म्हणाले की, पुळेकर यांचे सर्वांनी आभार मानायला हवेत. कुष्ठरोग आणि त्याच्याशी संबंधित कलंक या दोन्हींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी, त्याचा प्रसार, परिणाम आणि योग्य उपचार समजून घेण्यासाठी ही डॉक्युमेन्ट्री जगभरात या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. त्याचबरोबर प्रभावित व्यक्तींना निरोगी, अधिक सन्माननीय जीवन जगण्यास मदत करणारी ठरणार आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ वृत्तपत्र लेखिका श्रीमती मंदाकिनी भट, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक पास्कोल लोबो, वसंत हरयाण, रमेश सांगळे यांना वृत्तपत्र लेखक चळवळीसाठी अनेक वर्षे अमूल्य योगदान दिल्याबद्दल जीवन गौरव सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर दासावाचे कार्यकारिणी सदस्य यतीन कामथे,सुरेश शिंदे, कार्यक्रम प्रमुख सुनील कुवरे, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड, कार्यवाह नितीन कदम, माहिती जनसंपर्क खात्याचे निवृत्त प्रसिद्धी प्रमुख देवेंद्र भुजबळ, दूरदर्शनचे ज्येष्ठ कॅमेरामन अजित नाईक, प्रफुल्ल कळके, प्रोफेसर गोपीनाथ वाघमारे, अनिल समेळ आदी मान्यवर उपस्थित होते, तर ही Documentry देशा -परदेशात स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार असल्यामुळे या विशेष क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी दासावाचे वाचक सभासद, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे सभासद, चित्रपट-नाट्य कलाप्रेमी, नागरिक आणि विद्यार्थी हे मोठया संख्येने उपस्थित होते. दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व आणि डॉ. डोंगरे आणि जगदीश पुळेकर यांच्या कामाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे आपल्या प्रस्ताविकात दिगंबर चव्हाण यांनी सांगितले तर कार्यक्रम प्रमुख राजन देसाई यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली माजी अध्यक्ष विजय कदम, चंद्रकांत पाटणकर, अरुण खटावकर,अनंत आंगचेकर,दिलीप ल सावंत, राजेंद्र लकेश्री, रामचंद्र जयस्वाल,सूर्यकांत भोसले, चंद्रकांत तावडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# 400 हून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतली निरोगी हृदयाची प्रतिज्ञा

## जागतिक हृदय दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने जनजागृती उपक्रमाचे आयोजन

दैनिक युवक आधार *नवी मुंबई वार्ताहर

जागतिक हृदय दिनानिमित्त, मेडिकव्हर हॉस्पिटलने खारघर येथील वायएमटी कॉलेज आणि सीवूड्स येथील स्टर्लिंग कॉलेजमध्ये जनजागृती पर व्याख्यानांचे आयोजन केले होते. या उपक्रमात ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी निरोगी हृदयाची प्रतिज्ञा घेतली. हृदय समस्या टाळा आणि निरोगी हृदयाची प्रतिज्ञा घ्या हे या उपक्रमाचे ब्रीदवाक्य होते. भारतात हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांचे प्रमाण वाढत आहे आणि त्यातही तरुण रुग्णांची संख्या वाढत आहे. चूकीची जीवनशैली, वाढता तणाव , आहाराच्या चुकीच्या सवयी आणि शारीरिक हालचालींचा अभाव हे ऱ्हदयाच्या समस्यांना कारणीभूत ठरणारे प्रमुख घटक आहे. हृदयविकाराचा झटका, ऱ्हदयाचे अनियमित ठोके आणि उच्च रक्तदाब यासारख्या हृदय समस्या आता केवळ वृद्धांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. सध्या तरुणांना हृदयविकाराचा झटका आणि सडन कार्डियाक अरेस्ट हार्ट फेल्युअर सारख्या



समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. छातीत दुखणे, दम लागणे, छातीत धडधडणे आणि थकवा यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. वेळीच निदान व उपचार केल्यास भविष्यातील गंभीर गुंतागुंत टाळता येते आणि एखाद्याचा अमूल्य जीव वाचू शकतो असे इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे यांनी स्पष्ट केले.

*इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. ऋषी भार्गव सांगतात की,* महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रुग्णालयाने हाती घेतलेला हा अनोखा उपक्रम नक्कीच कौतुकास्पद होता. तज्ज्ञांनी नियमित व्यायाम, संतुलित आहार, तणावाचे व्यवस्थापन आणि नियमित तपासणी यासारख्या जोखीम घटक तसेच लक्षणे व प्रतिबंधाबाबत खास टिप्स दिल्या. मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल सांगतात की, जागरूकता ही प्रतिबंधाचे पहिले व महत्त्वाचे पाऊल आहे. आजच्या तरुण पिढीला मार्गदर्शन करणे म्हणजेच उद्याचे निरोगी कुटुंब निर्माण करणे होय. *सहभागी विद्यार्थीनी वर्षा सोनी सांगते की,* आम्ही मेडिकव्हर हॉस्पिटलचे आभारी आहोत की त्यांनी हा आरोग्यदायी उपक्रम राबविला. आम्ही अनेकदा ताणतणाव आणि वाईट सवयींकडे दुर्लक्ष करतो, परंतु आज आम्हाला समजले की ते भविष्यात किती धोकादायक ठरू शकते. याठिकाणी तज्ज्ञांनी दिलेल्या प्रतिबंधात्मक टिप्सचे आम्ही दैनंदिन जीवनात नक्कीच पालन करु आणि आमच्या हृदयाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देऊ.

# योगेश पालोदकर यांची दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या डिजिटल अँण्ड प्रिंट मीडिया सेलवर निवड

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड** :- चित्रपट, दूरचित्रवाणी, इंटरनेट आणि मनोरंजन क्षेत्रातील कलाकार आणि कामगारांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या दादासाहेब फाळके चित्रपट युनियनच्या छत्रपती संभाजी नगर विभागांतर्गत योगेश पालोदकर यांची युनियनच्या डिजिटल अँण्ड प्रिंट मीडिया सेलचे सदस्य म्हणून युनियनचे महाराष्ट्र राज्य प्रमुख संतोष आमले यांच्या शिफारशीने व राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हमूनकर यांच्या आदेशावरून करण्यात आली आहे. युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित म्हमूनकर यांच्या स्वाक्षरीने दिनांक 28 सप्टेंबरला हे नियुक्तीपत्र जारी करण्यात आले आहे. या पत्राद्वारे योगेश पालोदकर यांना युनियनचे सदस्यत्व प्रदान करण्यात आले असून, त्यांना संघटनेचे ध्येय धोरणे आणि कार्यक्रमांना यशस्वी करण्यासाठी तसेच समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दादासाहेब फाळके चित्रपट युनियन ही भारत सरकारच्या ट्रेड युनियन ॲक्ट, 1926 अंतर्गत नोंदणीकृत असून, ती चित्रपट उद्योगातील निर्माते, मालक आणि कला तंत्रज्ञानांना योग्य सेवा देण्यासाठी आणि त्यांचे समस्यांचे निराकरण करून न्याय मिळवून देण्यासाठी देशभरात कार्यरत आहे. योगेश पालोदकर यांच्या या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल त्यांच्यावर जिल्हा व तालुका स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या भावी कार्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहे.



# शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 60 हाजर रुपये द्या : बाबासाहेब जाधव

दैनिक युवक आधार
(जाफराबाद) टेंभुर्णी प्रतिनिधीः-अनिल ससाने



जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात मागील काही दिवसापासून सुरू असलेला पाऊस या पावसाने खरीप हंगामातील सर्वच पिकाचे नुकसान केले आहे दिवसान दिवस ते आणखी वाढत चाललेले आहे काही ठिकाणी तर शेतामध्ये पाणीच पाणी झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे या शासनाने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी 60 हजार रुपयाची आर्थिक मदत द्यावी अशी मागणी पापळ येथील युवक व अकोला देव जिल्हा परिषद राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते मा. बाबासाहेब जाधव यांनी दैनिक युवक आधारच्या प्रतिनिधींना प्रसिद्धी पत्रकात म्हटले की.. यावर्षी लागवडीपासून पावसाचे प्रमाण अधिक असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते गेल्या वर्षी पेक्षा यावर्षी लागवड ही मोठ्या प्रमाणात होती पिके बहारून जोमात असताना सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात पावसाने वेळोवेळी हजेरी लावून गेल्या काही दिवसापासून जाफराबाद तालुक्यासह पापळ ,नांदखेडा, काचनेरा,अकोला देव, देळेगव्हाण,पोखरी ,डोणगाव, निवडुंगा ,गाडेगव्हाण, आंबेगाव, तपोवन, सातेफळ ,बुटखेडा, आदी गावात गेल्या काही दिवसापासून झालेल्या पावसाने शेतकऱ्याचे कोट्याधी रुपयाची नुकसान केले शेतकऱ्याच्या तोंडी आलेला घास या निसर्गाने हिरावून घेतला जणू काही शेतकऱ्यावर निसर्गस कोपलाय?यामुळे जाफराबाद तालुक्यातील शेतकरी हा हतबल झाला आहे यावर्षी शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून तालुक्यात सरसगट पंचनामे करून शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी अकोला देव जिल्हा परिषद राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते. बाबासाहेब पाटील जाधव यांनी केले

# प्रबोधनातून बुद्ध आणि धम्म समजून सांगतो पण आचरण करणे आपल्यावर अवलंबून आहे_भंते शीलभद्र बोधी बुद्ध धम्मात वाईट व्यसनाला महत्त्व नाही

दैनिक युवक आधार संजीव भांबोरे भंडारा -बुद्ध धम्माचे तत्त्वज्ञान जो कोणी स्वीकारेल जो कोणी अमलात आले जो कोणी आचरण करेल त्याचे जीवन सुखमय समाधानी आणि सुखी समृद्ध होईल त्यामुळे बुद्ध आणि धम्म सर्वांनी वाचलं पाहिजे आचरण केले पाहिजे पंचशीलचे पालन केले पाहिजे दर रविवारी बुद्ध विहारात गेले पाहिजे आणि बुद्ध विहार दरवेळी उघडले पाहिजे त्यामध्ये बुद्ध धम्माचे वाचन झालं पाहिजे हे जरअस झालं तर बुद्ध धम्माचे प्रचार प्रसार व धम्म वाढवणे होय, बुद्ध धम्मात वाईट व्यसनाला महत्त्व नाही असे मत भंते शीलभद्र बोधी यांनी व्यक्त केले ते बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तालुका स्मारक समिती येथील वर्षावासानिमित्त उपासकांना मार्गदर्शन करताना आपले मत व्यक्त केले

सकाळी साडेपाच तर सात वाजेपर्यंत मेडिटेशन व सायंकाळी सहा ते सात वाजेपर्यंत बुद्ध धम्माच्या ग्रंथाचे वाचन असं तीन महिने उपक्रम सुरू आहे

याप्रसंगी तालुका स्मारक समितीचे अध्यक्ष दीपक साखरे, उपाध्यक्ष अशोक रंगारी, सूर्योदया रंगारी ,



पुष्पा बडोले, सुलभा हुमणे ,सुलभा हुमणे, शालू नंदेश्वर, नंदा कोचे, संगीता मेश्राम, शितल नागदेवे, सविता राऊत, प्रतिमा राऊत, शशिकला सांगोलकर, नलिनी करमरकर गीता खंडारे, उत्तमाँ गडपायले, स्वर्णमाला गजभिये, सुनंदा कोटांगले, धन्वंत नंदेश्वर, शामल मेश्राम, विना शहारे, कोमल खोब्रागडे, अरविंद राऊत, किशोर राऊत ,चंदन मेश्राम, सोनू राऊत, अशोक रंगारी, बी टी राऊत, डी जी रंगारी व इतरही बौद्ध उपासक प्रसंगी उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे पाण्याच्या पातळीत वाढ गोदा काठच्या नागरिकांनी सतर्क राहावे आ.दिलीप काका बनकर

दैनिक :युवक आधार
प्रतिनिधी– कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)
नाशिक जिल्ह्यात शनिवार पासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून अद्यापही पाऊस सुरूच आहे. म्हणायला काल पासून तसे बघितले तर तो दि.६.५.२०२५ पासून पडतोय. जिल्ह्यातील सर्वच धरणे १००% भरलेली असून आता पाऊसाचे पाणी सर्वच धरणामधून सोडावे लागत आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील विविध भागात पूर परिस्थिती निर्माण हाईल/ झालेली आहे. मुख्यत्वे निफाड तालुक्यातील गोदाकाठ भागात याचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. आपल्या कडील पाण्याचा फ्लो पूर्वेला असून पश्चिम पट्ट्यात, गोदावरीच्या खोऱ्यात होत असलेल्या पाऊसाचे पाणी नांदूरमध्यमेश्वर धरणातुन जात आहेत. पाण्याची वहन क्षमता, भौगोलिक परिस्थितीचा विचार करता बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे निफाड तालुक्यातील, मुख्यत्वे गोदाकाठ व कादवा नदी काठच्या नागरिकांनी, शेतकऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी. शासन, लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वतः व प्रशासन आवश्यक त्या त्या उपाययोजना करत आहोत. परंतु निसर्गापुढे कोणाचे काही चालत नाही. त्यामुळे सर्वांनीच काळजी घ्यावी. सोबत नाशिक जिल्ह्यातील धरणांची, सोडण्यात येणाऱ्या पुरपाण्याची स्थिती देत आहे.

आमदार दिलीपराव बनकर

Dt.28.09.2025 @ 10AM (Dam Discharge in Cusecs) Darna – 12167 Gangapur – 5328 Waldevi – 814 Alandi – 1263 Holkar Br.– 11210 Bhavli – 701 Bham – 1181 Waghad – 1192 Palkhed – 23968 N M Weir – 36918 Karanjwan– 12680 Kadwa – 6752 Tisgaon– 166 Gautami go–davari –1296 Kashypi –1280 Ozarkhed –2899 Punegaon – 3840 Mukne – 1520 Waki – 1320

तरी सर्व धरणांमधून पाण्याचा विसर्ग करण्यास सुरुवात झालेली आहे नदी/गोदा काठच्या सर्व नागरिकांनी सतर्क रहावे व सुरक्षित ठिकाणी जावे असे आवाहन आमदार दिलीप काका बनकर यांनी केले आहे.



# मातृभूमी सोशल फाउंडेशन तर्फे उत्कृष्ट पत्रकारिता व सामाजिक कार्य राज्यस्तरीय पुरस्कार संतोष लांडे व कांताभाऊ राठोड यांना प्रदान






दैनिक युवक आधार
– किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख
दिनांक 28 सप्टेंबर रोजी मातृभूमी स्पेशल फाउंडेशन च्या माध्यमातून पत्रकार भवन गांजवे चौक च्या शेजारी निवारा हॉल येथे पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील कर्तुत्वान मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .
यावेळी अजिंक्य न्यूज चॅनलचे संपादक व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष लांडे व झेप फाउंडेशन पुणे (महाराष्ट्र राज्य) चे संस्थापक अध्यक्ष व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष कांताभाऊ राठोड यांचा उत्कृष्ट पत्रकारिता व सामाजिक कार्य राज्यस्तरीय पुरस्कार जगप्रसिद्ध मूर्तीशास्त्रज्ञ श्री .मा.गो.ब देगलूरकर सर यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे मुख्या अतिथी म्हणून गो.ब देगलूरकर सर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ.महेश थोरवे सर संचालक एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट पुणे ,मा . अँड .संग्राम नाथाभाऊ शेवाळे सदस्य युवा धोरण समिती महाराष्ट्र राज्य ,मा. श्री किरण बाळकृष्ण कदम सर संचालक किरण कंट्रक्शन ,मातृभूमी सोशल फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष अशोक पाटील साहेब, मा .सौ भारतीताई रमेश तुपे संस्थापक अध्यक्ष भारतीय नारी संघटना, मा . सौ श्रद्धाताई गोरक्ष परांडे सौ. श्रद्धाताई गोरक्ष ( आप्पा) परांडे जनहित मंच, मा .श्री सुनील सुरेश गोरे अध्यक्ष राष्ट्रभक्ती परिवार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे व अतिथी यांनी मार्गदर्शन केले . या पुरस्कारासाठी महाराष्ट्रभरातून विविध क्षेत्रातील पुरस्कार्थी उपस्थित होते वेगवेगळ्या क्षेत्रातील 50 पुरस्कार्थींना पुरस्कार देऊन यावेळी गौरवण्यात आले. पुरस्कार देण्यामागे अशोक पाटील सर यांचे असे मत आहे की पुरस्कार हा माणसाला अजून जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा देत व कशा परिस्थितीतून मात करून ध्येयापर्यंत पोहोचतात याची एक शीख, उदाहरण लोकांसमोर उभे राहते या कार्यक्रमाच्या शेवटी चहा ,नाष्टयाची सोय करण्यात आली होती

# आदिवासी समाजाबाबत आक्षेपार्ह मजकूर वायरल; युवकास अटक

दैनिक युवक आधार –
घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर
सध्या आरक्षणाबाबत आदिवासी समाज व बंजारा समाजाकडून मोठ्या प्रमाणावर आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर आदिवासी समाजाबद्दल आक्षेपार्ह मजकूर वायरल झाल्याची घटना 27 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. याप्रकरणी संतोष दशरथ राठोड वय 35 राहणार भांबोरा या युवकाने फेसबुक वर आदिवासी समाजाबद्दल अर्वाच्य भाषेत मजकूर पोस्ट केल्याचे समोर आले. संबंधित पोस्ट दोन समाजात तणाव निर्माण करणारी असल्यामुळे पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई करत त्यास ताब्यात घेण्यात आले. दरम्यान या प्रकारामुळे समाजात तीव्र नाराजी व्यक्त होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलीस सतर्क झाले आहेत.



सदर घटनेची तक्रार समाजाच्या वतीने आकाश सुभाषराव आत्राम यांनी घाटंजी पोलिसात 28 सप्टेंबर 2025 रोजी रीतसर दिली यावरून अनुसूचित जात जमाती कायदा अंतर्गत कलमानुसार कारवाई करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज बांधव पोलीस स्टेशन घाटंजी येथे एकत्र आले होते. यावेळी समाज बांधवांच्या भावना अनावर झाल्याचे दिसत होते. तेव्हा समाजामधील तेढ निर्माण होण्याची शक्यता होती परंतु आदिवासी समाजातील काही सुज्ञ समाज बांधवांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून उपस्थित जनसमुदायाचा समज काढून वातावरण शांत केले. तेव्हा सर्व समाजाने या प्रकरणातील आरोपी विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी आदिवासी समाजातील अनेक बांधव उपस्थित होते.

# पनवेलमध्ये वोकल फॉर लोकल खरेदी-विक्री प्रदर्शन

**दैनिक युवक आधार पनवेल (प्रतिनिधी )**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत पनवेल येथे वोकल फॉर लोकल या संकल्पनेवर आधारित खरेदी–विक्री प्रदर्शनाचे भव्य आयोजन रविवारी करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन वर्षा ठाकूर यांच्या हस्ते झाले.

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या वतीने पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभास आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ममता प्रीतम म्हात्रे, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, सुनील बहिरा, शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, सुरेखा मोहोकर तसेच रूपेश नागवेकर, स्वाती कोळी, मालवणकर, अश्विनी अत्रे, कल्पना पाटील, कोमल कोळी, ज्योती देशमाने आदी उपस्थित होते. या वेळी सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या कार्यक्रमाचेही थेट प्रक्षेपण सर्वांनी अनुभवले.



या प्रदर्शनातून स्थानिक उत्पादने, हस्तकला आणि पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात आला. महिलांच्या स्वयंसहाय्य गटांनी, स्थानिक उद्योजकांनी व कारागिरांनी आपल्या उत्पादनांचे आकर्षक स्टॉल्स येथे लावले होते. या उपक्रमामुळे स्थानिक उत्पादने व उत्पादकांना व्यासपीठ मिळाले असून वोकल फॉर लोकल या संकल्पनेला प्रत्यक्षात मूर्त स्वरूप मिळाल्याचे दिसले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या पनवेल शहराध्यक्ष रूचिता लोंढे, कोमल कोळी यांच्यासह महिला पदाधिकाऱ्यांनी संयोजक म्हणून परिश्रम घेतले.

# शिक्षणाला प्राधान्य देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत - संजय आवटे

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

दैनिक युवक आधार
पनवेल(प्रतिनिधी) आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे,यासाठी आपल्या भरीव मदतीतून शिक्षणाला प्राधान्य देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक कार्य आदर्शवत असल्याचे मत दैनिक लोकमतचे (पुणे) संपादक, विचारवंत संजय आवटे यांनी पनवेल येथे एका सोहळ्यात व्यक्त केले. गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त सन्मान कर्तृत्वाचा ..सन्मान पनवेलकरांचा या अंतर्गत पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळ्याप्रसंगी संपादक संजय आवटे बोलत होते.पनवेलच्या मार्केटयार्ड येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्यास लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर,ज्येष्ठ संपादक मधुकर भावे,पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे,सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे,सुप्रसिद्ध अभिनेत्री ऋतुजा बागवे,कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष संजय गुंजाळ,पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी आदी होते. याप्रसंगी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना ज्येष्ठ संपादक मधुकर भावे व लोकमतचे संपादक संजय आवटे यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, त्याचबरोबर पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित आले. पुढे बोलताना संजय आवटे म्हणाले, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे दातृत्व आहे,पण ते दातृत्व कुठल्या ठिकाणी करावे याचे भान त्यांना आहे.जर शाळा चांगल्या नसतील तर विद्यार्थ्यांचे भवितव्य घडणार नाही,रामशेठ ठाकूर तुमच्यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळत असेल तर असा नेता आम्हाला हवा आहे. रामशेठ ठाकूर यांचे हे शैक्षणिक आदर्श कार्य महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी घेतले तर महाराष्ट्रात चिंता असणार नाही.वृत्तपत्र चालवणे ही मोठी कठीण गोष्ट आहे.आज पत्रकारिता बदलत चालली आहे.मोबाईलने क्रांती केली आहे,माध्यमे हातात आली असली तरी विचार करायला शिकवत नाही. सर्वसामान्य माणूस हा अत्यंत महत्त्वाचा आहे.हा देश सर्वसामान्यांचा आहे.हा देश तुमचा आणि माझा आहे,त्यामुळे सर्वसामान्य केंद्रबिंदू असला पाहिजे त्यामुळेच आपला विकास होईल, असे त्यांनी शेवटी सांगितले. ज्येष्ठ संपादक मधुकर भावे यांनी आपल्या भाषणात,वाचणाऱ्यांची संस्कृती आज संपत चालली आहे. लोकांचे प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरणारा नेता नाही.गरिबांच्या प्रश्नाला कोणी वाली नाही.आवाज उठवणारे वृत्तपत्र नाहीत.लेखणीची ताकद राहिली नाही अशी खंत व्यक्त करून आज संपादक नसताना वृत्तपत्र चालतात. पत्रकार कधी स्वस्त बसत नाही जे तुम्हाला लिहिता येतं ते लिहीत रहा, अशी अपेक्षा शेवटी त्यांनी व्यक्त केली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात, समाजात चांगलं काम करणाऱ्या व्यक्ती,संस्थांचा पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने सन्मान पनवेल टाइमतर्फे करण्यात आला ही कौतुकाची गोष्ट आहे. वृत्तपत्रे ही सर्वसामान्यांचा आवाज उठवणारी असावीत,आवश्यक तेथे आक्रमक बातम्या प्रसिद्ध करून सर्वसामान्यांना वृत्तपत्रांनी न्याय दिला पाहिजे.वृत्तपत्रांनी पत्रकारितेबरोबरच सामाजिक उपक्रम राबविले पाहिजेत. लोकसंख्या वाढीबरोबरच आज त्या ठिकाणी समस्या वाढत आहेत. त्याचं नियोजन झालं पाहिजे.पत्रकारितेतून प्रशासनाचे वृत्तपत्रांनी लक्ष वेधले पाहिजे असे सांगून त्यांनी सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. यांप्रसंगी सुप्रसिद्ध अभिनेत्री ऋतुजा बागवे हिचे भाषण झाल. सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन गौरव पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पनवेल टाइमचे संपादक गणेश कोळी यांनी केले.वर्धापन




दिनानिमित्ताने विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर–पनवेल.. या विषयावरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके देण्यात आली. पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त, फॅशन शो संचालक देवदत्त घरत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल सौंदर्यवती (रणवे) स्पर्धा आयोजित करण्यात आली होती,स्पर्धकांनी मोठ्या प्रतिसाद दिला,त्यांच्या कलेला मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले.

# डॉ. विनय दत्तात्रय देशमुख सार्वजनिक वाचनालय, तळा येथे श्लोक पाठांतर स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार तळा प्रतिनिधी**
डॉ. विनय द. देशमुख सार्वजनिक वाचनालय तळा यांच्या वतीने नुकतेच मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी श्री मनोज वाढवळ यांनी उपस्थित सर्व प्रमुख अतिथी हा मान्यवरांचे शब्द सुमनाने स्वागत करून कार्यक्रमाला सुरुवात केली. यामध्ये रा. जि. प. शाळा तळे व प्राथमिक विद्यामंदीर तळा या शाळेतील २० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. अतिशय उत्तम आणि प्रेरणादायक असे सादरीकरण या विद्यार्थ्यांनी केले. श्री मुतंगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी दररोज वाचन केले पाहिजे, वाचन हा एक उत्तम छंद आहे, वाचन हे वेगवेगळ्या भाषेमध्ये करता येऊ शकते, वाचन केल्यामुळे मुलांमध्ये उत्तम गुण विकसित होत असतात, वाचनामुळे अनेक फायदे होतात त्यामध्ये मुलांमध्ये शब्द उच्चार, शब्दसंग्रह, ज्ञान आणि जागृती होते असे सांगितले. तसेच ग्रंथालयाचे अध्यक्षा सौ. ऋता देशमुख यांनी मुलांनी दररोज वाचन केले पाहिजेत. त्यांच्या सभोवतालचे जग समजून घेणे समस्या सोडवण्याची क्षमता बळकट करण्यासाठी वाचन फार महत्त्वाचे आहे. आज मुलाने घरामध्ये कथा, कादंबऱ्या, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, गोष्टींची पुस्तके, अनेक मासिके ग्रंथालयामध्ये येत असतात त्यांचा वापर जर विद्यार्थी यांनी केला तर एक चांगला वाचक तयार होऊ शकतो असे मत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सौ. ऋता किरण देशमुख, श्री किरण देशमुख, डॉ. विभावरी देशमुख, जयश्री वडके आदी सदस्य उपस्थित होते. त्याचबरोबर विद्यार्थी समवेत शिक्षक सौ मित्तल वावेकर व नितेश साबळे उपस्थित होते.
परीक्षक म्हणून डॉ. विभावरी देशमुख, सौ जयश्री वडके व श्री मुतंगे सर यांनी उत्तम रित्या परीक्षकाचे काम पहिले. तळे मराठी शाळेच्या शिक्षिका सौ मित्तल वावेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अशा स्पर्धा सतत घेतल्या पाहिजेत, जेणेकरून विद्यार्थ्यांचे पाय हे ग्रंथालयाकडे वळतील. शेवटी ग्रंथालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून उपस्थित सर्व अतिथी, शिक्षक, व विद्यार्थ्यांचे आभार मानले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते

# लोणीच्या केंद्रप्रमुख आशाताई मगरे यांची रात्री नऊ वाजता आपत्ती व्यवस्थापनासाठी कस्तुरबा गांधी विद्यालयाला भेट...

**दैनिक युवक आधार परतूर-जालना(अशोक ढोके)**
मौजे आंबा, तालुका परतूर जिल्हा जालना येथील कस्तुरबा गांधी विद्यालय हे अत्यंत गरजू, गरीब मुलींना शिक्षण देण्याचं महत्त्वाचं काम करत आहे. परतूर पासून लगभग तीन किलोमीटर अंतरावर हे विद्यालय आहे, तेथे मुख्याध्यापिका म्हणून ज्योती साळवे, व वॉर्डन नारायणकर या विशेष लक्ष विद्यार्थिनीकडे देत असतात, परंतु सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे कस्तुरबा गांधी विद्यालयातील टाईप– 2 च्या वसतिगृहाला गळती लागली आहे व दोन हॉल मोडकळीस आले आहेत, याची माहिती मिळताच कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख आशाताई मगरे या रात्री नऊ वाजताआपत्ती व्यवस्थापनासाठी तात्काळ कस्तुरबा गांधी विद्यालयात दाखल झाल्या, तेथील परिस्थितीची पाहणी करून तात्काळ वसतिगृहातील मुलींची कार्यालय व भोजन कक्षा मध्ये व्यवस्था करण्यात आली व त्यांच्याशी चर्चा करून मार्गदर्शन केले तसेच मुख्याध्यापिका ज्योती साळवे व वॉर्डन नारायणकर यांना मार्गदर्शक सूचना दिल्या व त्याची माहिती वरिष्ठाना दिली.